N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** मुलचेरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0040 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/05/2024 20:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 21/05/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/05/2024
**Time From (वेळेपासून):** 12:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/05/2024 **Time (वेळ):** 20:44 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/05/2024 20:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 00.500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय, मुलचेरा,मुलचेरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री दर्शन मेघराज गेडाम

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : मेघराज गेडाम

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुखडी टोला,मुलचेरा ,मुलचेरा,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुखडी टोला,मुलचेरा ,मुलचेरा,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल भाऊजी डोंगरे | | वडील का नाम : भाऊजी डोंगरे | 1. आंबेडकर चौक वार्ड क्र 04, आष्टी,चामोर्शी,चामोर्शी, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 32 GB sundisk | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि | मोबाईल फोन | one plus nord | 10,000.00 |

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | | |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये ची एक नोट | 500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

नक्कल फिर्याद

पोलीस स्टेशन मुलचेरा

दिनांक 21/05/2024
नांव:- श्री दर्शन मेघराज गेडाम, वय 30 वर्षे, धंदा-शेती, रा.मु.मुखडी टोला पो. गोविंदपूर ता. मुलचेरा जि. गडचिरोली मो.नं.7588756977

मी आज दिनांक 21/05/2024 रोजी सकाळी 8.12 वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील श्री. श्रीधर भोसले यांना फोनव्दारे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली. त्यानुसार लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले हे शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मुलचेरा गावाला लागून असलेल्या जंगल परिसरात येथे 12.02 वा. पोहचले. सांगितल्याप्रमाणे मी आणलेल्या होन्डा ड्रिम युगा कंपनीचे क्र. एचएच 33 एक्स 6810 ने मुलचेरा गावाला लागून असलेल्या जंगल परिसरात हजर होतो. त्यांचे समक्ष लोकसेवकाविरुद्ध लाच मागणी संबंधाने लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय गडचिरोली कॅम्प मुलचेरा येथे आज दिनांक 21/05/2024 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर राहत असून वरील प्रमाणे काम करतो.

माझी आई नामे जिवनकला गेडाम हिचे नावे असलेला राशन कॉर्डमध्ये वडील, मजवा भाऊ गुरूदास गेडाम, वहिणी वर्षा गेडाम, व भावाची मुलगी सलोनी गेडाम व माझे नावे असा राशन कार्ड होते. माझे मजवा भाऊ गुरूदास यांचा कुटुंबाचा माझी वहिनी नामे वर्षा गुरुदास गेडाम यांच्या नावे दि. 30/11/2023 मध्ये नविन राशन कॉर्ड तयार करण्यात आले.

माझी वहिणी वर्षा गेडाम यांनी थम मशीन वरती नाव न आल्याने राशन मिळत नसल्याचे वहिणी वर्षा यांनी मला सांगितले. त्यामुळे मी दि. 08/05/2024 रोजी मी नविन राशन कॉर्ड घेउन तहसिल कार्यालय मुलचेरा येथे जावून तेथील पुरवठा निरीक्षक श्री. राहुल डोंगरे यांना भेटून त्यांना मी माझी वहिणी वर्षा गेडाम यांचे नावे राशन कार्ड असून थम मशिनवर नाव न आल्याने राशन मिळत नसल्याचे सांगितले. त्यांनी मला महाफुड साईडवर कागदपत्रे अपलोड करावे लागतात त्याकरीता हमीपत्र, उत्पनाचा दाखला, राशन कार्ड झेरॉक्स, चारचाकी वाहन नसल्याचे प्रमाणपत्र, व राशन कॉर्डमध्ये नाव असलेल्या सर्वाचे आधार कार्ड झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे आणण्यास सांगितले. त्यानंतर मी कागदपत्रे जमा करून दि. 13/05/2024 रोजी अंदाजे 12 .00 वा. दरम्यान पुन्हा पुरवठा निरीक्षक श्री. राहुल डोंगरे यांना भेटून कागदपत्रे दिले असता त्यांनी मला ''महाफूड सॉईडवर कागदपत्रे अपलोड करण्याकरीता 500/- रू. दे, असे म्हणाले. तेव्हा मी पुरवठा निरीक्षक श्री. राहुल डोंगरे यांना ''सध्या माझेकडे पैसे नाहीत'' असे म्हणालो असता, त्यांनी कागदपत्रे माझेकडे परत दिले व पैसे जमवून तहसिल कार्यालय मुलचेरा येथेच आणून दे, नाही तर मी महाफुड सॉईडवर कागदपत्रे अपलोड करणार नाही, असे म्हणून मला 500/-रू. ची मागणी केली.

पुरवठा निरीक्षक श्री. राहुल डोंगरे यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुष्मनी नाही अथवा भांडण नाही तसेच

कोणतीही आर्थीक देवाण घेवाणचे व्यवहार नाहीत. परंतु पुरवठा निरीक्षक श्री. राहुल डोंगरे यांनी मला महाफुड सॉईडवर कागदपत्रे अपलोड करण्याकरीता 500/-रूपये लाच रक्कमेची मागणी केली असून त्यांना 500/-रूपये लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने तसेच तेंदूपत्ता तोडणी चालू असल्या कारणाने मी आज रोजी त्यांचेविरूध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले 500/- रूपये हे माझे वैयक्तिक बचतीतील आहे व सोबत कागदपत्रे व वहिणी वर्षा गेडाम यांनी लिहुन दिलेले अधिकार पत्र सोबत जोडुन देत आहे.

त्यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री श्रीधर भोसले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.श्रीधर भोसले यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 500/- (रू. 500/- दराची 01 चलनी नोट) घेतली. त्यावेळी सदर नोटचे क्रमांक नोंदवुन घेतले. त्यानंतर सदर नोटवर अंथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अंथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोषि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन वेळ 12.57 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 श्री. मुकुंदा सिडाम यांचेसह तहसिल कार्यालय मुलचेरा येथे माझे दुचाकी वाहनाने रवाना झालो.

तेव्हा गैरअर्जदार श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक तहसिल कार्यालय मुलचेरा येथे आपले कक्षात हजर मिळुन आले. त्या दरम्यान श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक यांनी मला महाफुड साईडवर कागदपत्रे अपलोड करण्याकरीता 500/- रू लाच रक्कमेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवीली व कागदपत्रे स्वतःकडे ठेवून घेतले. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर माझी अंगझडती घेतली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भासले साहेब यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र. 1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक तहसिल कार्यालय मुलचेरा यांनी महाफुड साईडवर कागदपत्रे अपलोड करण्याकरीता 500/-रू. लाच रक्कमेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक यांचे विरुध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर माझी अंगझडती घेतली व रू. 500/- लाच रक्कम माझे फुलपॅन्टच्या मागील उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर तहसिल कार्यालय मुलचेराच्या बाहेर दर्शनी भागी येवून डोळयाला गॉगल लावुन लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 यांचेसह माझे स्वतःचे दुचाकी वाहनाने तहसिल कार्यालय मुलचेरा येथे रवाना झालोत. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य माझे मागोमाग आले. मी तहसिल कार्यालय मुलचेरा येथे गेलो असता, त्याठिकाणी श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक हे हजर मिळुन आले. त्यांचेसोबत कामासंबंधी बोलणी झाल्यानंतर त्यांनी मला उजव्या हाताच्या बोटाने पैशा बाबत इशारा केला टेबलचा ड्राव्हर खोलून ''टाकून दे येथे'' असे बोलून पुन्हा टेबलच्या ड्राव्हर कडे ईशारा करुन ''तेथे टाकून दे तेथे'' असे बोलल्याने मी अंथ्रॅसिन पावडर लावलेले रू. 500/- लाचेची रक्कम माझे फुलपॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिश्यातुन उजव्या हाताने काढून टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवून दिले.

त्याचवेळी मी तहसिल कार्यालयाच्या दर्शनीभागी येउन सापळा पथकास माझेजवळ असलेले गॉगल लावुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक यांना पकडुन पुढील कारवाई केली. पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद केले व नंतर माझी अंगझडती घेण्यात आली. लाच रक्कम 500/- रू., वन प्लस कंपनीचा 01 नग मोबाईल, कामासंबधीचे कागदपत्रे हे श्री. राहुल डोंगरे, पुरवठा निरीक्षक यांचेकडुन तसेच नमुद कारवाईतील मेमोरी कार्ड पंचासमक्ष जप्तीपत्रका प्रमाणे पुराव्याकामी जप्त केले. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री श्रीधर भोसले यांनी प्रात्याक्षीक, पडताळणी व सापळा पंचनाम्यात घेतले आहेत.

तरी श्री. राहुल भाऊजी डोंगरे, वय 40 वर्ष, पद-पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय मुलचेरा ता. मुलचेरा जि. गडचिरोली यांनी मला महाफुड साईडवर कागदपत्रे अपलोड करण्याकरीता 500/- रू. लाच रक्कमेची मागणी करुन 500/-रू. लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात मिळून आल्याने त्यांच्याविरूद्ध माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

इंग्रजी अस्पष्ट सही
श्री दर्शन मेघराज गेडाम,
रा.मु.मुखडी टोला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ashok sanjay bhapkar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ashok sanjay bhapk.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): स्टेशन हाऊस ऑफिसर
पोलीस स्टेशन मुळशी